# ३१ मार्च २००९ हे वरदान

सहकारी संस्थांचा महत्वाचा दिवस म्हणजे ३१ मार्च. वास्तविक प्रत्येक दिवस संस्थांसाठी महत्वाचा. परंतु वर्षभर केलेले कामकाज व त्याचा लेखा - जोखाची अंतीम लक्ष्मण रेषा ३१ मार्च ही कायद्याने निश्चित केलेली आहे.

जवळपास अडीच महिने आपल्या हातात आहेत. पतसंस्थांना तर ह्याविषयी अत्यंत जागरूक राहुनच ह्या वर्षापासून काम करावे लागणार आहे. एन. पी. ए. च्या तरतुदीचे नवीन परिपत्रक ह्याच अंकात प्रसिध्द केलेले आहे. ह्या व्यतिरिक्त अनेक गोष्टींसाठी ह्या अडीच महिन्यात उपाययोजना करता येणे शक्य आहेत.

प्रत्येक पतसंस्थेने ३१ डिसेंबर २००८ चा ताळेबंद व नफा तोटा पत्रक समोर ठेवणे आवश्यक आहे. लेखापरिक्षणासाठी ज्या मुद्यांसाठी जेवढे मार्कस् आहेत, ह्या विषयी प्रथम वाचन व तपासणी करून ३१ मार्च २००९ पर्यंत काय काय करावे लागणार ह्याची चर्चा होवून नियोजन करणे आवश्यक आहे. नियोजन करतानाच पदाधिकारी, संचालक व अधिकारी - कर्मचारी ह्यांचेवर जबाबदारी देवून त्यांची विभागणी लेखी केली पाहिजे. कोणी कुठल्या विषयाची जबाबदारी उचलायची व राहिलेल्या ७५ दिवसात प्रत्येक जण प्रामुख्याने थकबाकी, तरतुदी, भाग भांडवल व ठेवीमध्ये वाढ, गुंतवणुक व संस्था नफ्यात कशी राहिल इत्यादी बाबी डोळ्यासमोर ठेवूनच जबाबदाऱ्या विभागून देणे आवश्यक आहे.

परंतु जबाबदारी मात्र त्याच्या प्रत्यक्ष क्षमतेनुसारच देण्यात यावी. सरसकट व समान जबाबदारी देण्याची ही वेळ नाही. कारण ३१ मार्च २००९ रोजी प्रत्यक्ष कायद्यानुसार कृतीच हवी आहे. जे प्रत्यक्ष कृती करून ठरविलेली जबाबदारी पूर्ण करतील, त्यांचीच प्रचंड मेहनत करण्याची ह्या कालावधीत जरूरी आहे. ह्या ७५ दिवसांत प्रक्षिशिण व भाषणांनी काहीही साध्य होणार नाही. व बाहेरील मार्गदर्शन तर ह्या कालावधीत फारसे उपयुक्त ठरत नाही. ह्यासाठी १ - २ जणांना मोकळे सोडले तरी चालेल.

पतसंस्थांनी ह्याच वेळेत प्रत्येक तारखेस काय करायचे हे ठरविणे आवश्यक आहे. कारण पतसंस्थांसाठी कुठलेही पॅकेज मिळण्याची सुतराम शक्यता नाही. आणि तेवढा वेळ व मानसिकता मायबाप सरकारची अजूनही नाही. समाजातील जवळजवळ प्रत्येक घटकांसाठी पॅकेज व माफी जाहीर होत आहे. परंतु पतसंस्थांना मात्र अजुनही दुर्लक्षणेच चालू आहे.

तूर्त आपणच आपले प्रश्न सोडविण्यासाठी सतर्क राहू या. पतसंस्थांचे चांगले दिवस दृष्टीक्षेपात आहेत. केंद्र व राज्य सरकारला पतसंस्थांची दखल घ्यावीच लागणार आहे. फक्त त्याची जाण अजून होत नाही. कारण त्यांना अजून पतसंस्थांची झळ पोहचली नाही. जेव्हा जवळच्याला चटका बसत नाही, तो पर्यंत जाग येणे शक्य नाही. किंवा जोपर्यंत त्यांचे पतसंस्थांमुळे आडेल, तेव्हा पतसंस्थांचे प्रश्न सुटतील, वेळच यावी लागते. आणि त्यासाठी

प्रयत्न यशस्वी होतील ह्यात शंका नाही.

परंतु त्यासाठी पतसंस्थांनी ह्या ७५ दिवसात आपला कोणी मायबाप नाही, हे गृहीत धरूनच अत्यंत जिद्दीने, कष्टाने व स्वाभिमानाने व अभ्यासपूर्वक धडक कृतीयोजना लेखी आखून राबवावी. प्रत्येक दिवस व दिवसाचा प्रत्येक तास ठरविलेले काम पूर्ण करावे. ३१ मार्च २००९ आपणाला वरदानच ठरेल. सर्वांना शुभेच्छा !!

२००९ ह्या नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!!

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!